महाराष्ट्र पोलीस

## प्रसिध्दीपत्रक

पोलीस उप आयुक्त, वाहतुक यांचे कार्यालय,
बंगला नं ६ येरवडा पोस्ट ऑफीस जवळ,
पुणे-४११००६

पुणे शहर वाहतूक पोलीस PUNE CITY TRAFFIC POLICE


पुणे दिनांक -०८/०३/२०२५

जा.क्र./पोउआ/वाह/ ९८८४ /२०२५

पुणे शहरातील वाहतुक सुरक्षित व सुरळीतपणे होणेकरीता, महाराष्ट्र शासन गृह विभाग क्र. एम. व्ही. ए. ०१९६/८७१/सीआर - ३७/टीआरए - २, दिनांक - २७/०९/१९९६ चे नोटीफिकेशननुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६(१) (ए) (बी), ११६(४) आणि ११७ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करुन मी अमोल झेंडे, पोलीस उप-आयुक्त, वाहतुक, पुणे शहर, येरवडा वाहतुक विभागातील खालील नमुद रस्त्यांवर तात्पुरत्या स्वरुपात खालील प्रमाणे आदेश निर्गमित करीत आहे. यापुर्वी या ठिकाणी वाहतूकीचे असलेले निर्बंध रद्द करण्यात येत आहेत.

**येरवडा वाहतुक विभाग पुणे अंतर्गत,**

- **पुण्याकडुन वडगाव शेरीकडे, तसेच साकोरेनगर कडुन वडगाव शेरी व पुण्याकडे त्याचप्रमाणे वडगाव शेरी कडुन विमाननगर व साकोरे नगर कडे जाणारा वडगाव शेरी चौकातील मेट्रो पिलर नं. ४२८ व ४२९ मधील १३८ फुट असलेला चौक बंद करण्यात येत आहे.**

**पर्यायी मार्ग :-**

- **विमाननगर फिनिक्स मॉलकडुन येणारे वाहन चालकांनी पिलर क्रमाक पी ४२३ ते पी ४२२ मधुन यु टर्न घेवून (हयात हॉटेल) साकोरे नगर कडे इच्छितस्थळी जावे.**
- **साकोरेनगर / विमाननगर कडुन वडगाव शेरी व पुण्याकडे जाणाऱ्या वाहन चालकांनी वडगाव शेरी चौकात डाव्या बाजुस वळुन वडगाव शेरी चौकाच्या पुढे अग्निबाज समोरील पंक्चर मधुन उजवीकडे यु टर्न घेवुन डाव्या बाजुने वडगाव शेरीकडे किंवा सरळ पुण्याकडे इच्छितस्थळी जावे.**
- **पुण्याकडुन वडगाव शेरी कडे जाणाऱ्या वाहन चालकांनी वडगाव शेरी चौकाच्या पुढे अग्निबाज समोरील पंक्चर मधुन उजवीकडे यु टर्न घेवुन डाव्या बाजुने वडगाव शेरीकडे इच्छितस्थळी जावे.**
- **वडगाव शेरी कडुन विमाननगर फिनिक्स मॉल किवा विमाननगर/साकोरेनगर कडे जाणाऱ्या वाहन चालकांनी वडगाव शेरी चैाकात डाव्या बाजुस वळुन रामवाडी मेट्रो स्टेशनच्या अलिकडे मेट्रो पिलर क्रमांक पी ४२३ ते पी ४२२ या दरम्यान असलेल्या पंक्चर मधुन उजव्या बाजुस यु टर्न घेवुन वडगाव शेरी चौकातुन सरळ नगर रोडच्या दिशेने जावे किंवा डाव्या बाजुस वळुन हयात हॉटेल समोरुन विमाननगर/सोकोरेनगरकडे इच्छितस्थळी जावे.**

तरी नागरीकांनी याबाबत आपल्या काही सुचना असल्यास त्या पोलीस उप-आयुक्त, वाहतूक नियंत्रण शाखा, येरवडा पोस्ट ऑफीस, बंगला नं-६ जेल रोड पुणे यांचे कार्यालयात दिनांक – ०८/०३/२०२५ ते दिनांक – २२/०३/२०२५ पर्यंत लेखी स्वरूपात कळवाव्यात. नागरीकांच्या सूचना व हरकती विचार करुन व अत्यांवश्यक सेवेतील वाहने (उदा. फायरब्रिगेड, पोलीस वाहने, रुग्णवाहीका, इ.) खेरीज करून अंतिम आदेश काढण्यात येतील.

पोलीस उपआयुक्त वाहतुक विभाग, पुणे.
सत्यमेव जयते

(अमोल झेंडे)
पोलीस उप-आयुक्त ,वाहतूक
पुणे शहर

प्रति,

**१) जिल्हा माहिती व प्रसिध्दी अधिकारी,** नविन मध्यवर्ती इमारत, पुणे - ०१

२/- सदरची प्रेसनोट सर्व वर्तमानपत्रातुन प्रसिध्द करण्याची विनंती आहे.

प्रत :-

**२)सहा. पोलीस आयुक्त, वाहतूक – परि १,** पुणे शहर.

**३) पोलीस निरिक्षक, प्रेसरूम,** पोलीस आयुक्त कार्यालय, पुणे शहर

२/- सदर प्रेसनोटच्या प्रती पत्रकारांना देवून, सदरची बातमी वर्तमानपत्रातून प्रसिध्द करण्याची विनंती करावी.

४) **प्रभारी अधिकारी येरवडा** वाहतुक विभाग, पुणे शहर.

२/- **सदर प्रेसनोटच्या प्रती संबंधित दुकानदार / प्रतिष्ठीत व स्थानिक नागरिक यांना तात्काळ अदा करून, त्यांची स्वाक्षरी घेवून ती प्रत इकडील कार्यालयात रिपोर्टासह दोन दिवसात सादर करावी.**

**५) पोलीस उप निरीक्षक, मल्टीमिडीया कक्ष, वाहतूक शाखा, पुणे शहर**

२/- सदर प्रेसनोट ही पुणे वाहतुक पोलीस वेबसाईट व फेसबुकवर / ट्विटरवर अपलोड करावी. सदरची प्रेसनोट कोणत्या वर्तमानपत्रात प्रसिध्द झाली आहे, त्या वर्तमानपत्राचे कात्रणाची छायांकित प्रत इकडील कार्यालयात सादर करावी.

**६) पोलीस निरीक्षक, नियोजन, वाहतूक शाखा, पुणे शहर**

२/- संबंधित विभागांचे प्रभारी अधिकारी यांचेकडून पुर्तता अहवाल प्राप्त करुन घेऊन सादर करावा.